# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.06.2024** **वार:शनिवार**

1. ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागू देणार नाही अशी-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही
2. ओबीसी आरक्षणप्रश्नी, अधिवेशनात सर्वपक्षीय बैठक घेण्याचा निर्णय
3. दहावा आंतरराष्ट्रीय योग-दिन राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा आणि
4. 18 व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची सांगता; द गोल्डन थ्रेड माहितीपटाला सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा - सुवर्णशंख पुरस्कार

**ओबीसी-बैठक**

ओबीसी आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यात सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारनं काल ओबीसी नेत्यांच्या शिष्टमंडळाबरोबर मुंबईत बैठक घेतली. ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागू देणार नाही. तसंच कोणालाही खोटे कुणबी दाखले दिले जाणार नाहीत, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ओबीसी नेत्यांना दिलं. या बैठकीनंतर मंत्री छगन भुजबळ यांनी माध्यमांना ही माहिती दिली. ओबीसी समाजाबाबत निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्याचा तसंच या मुद्द्यावर सर्वपक्षीय बैठक घेऊन तोडगा काढण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. राज्यात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे गेल्या काही महिन्यांपासून आंदोलन करत आहेत. त्यानंतर आता ओबीसींच्या हक्कासाठी उपोषणाला बसलेल्या- लक्ष्मण हाके यांचंही आंदोलन सुरू आहे, या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने जालन्यातील वडगोद्री इथे जाऊन लक्ष्मण हाकेंची भेट घेतली आणि त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्या उपस्थितीत ओबीसी नेत्यांची मुंबईत महत्वाची बैठक पार पडली. राज्याचे अनेक मंत्री आणि नेते यावेळी उपस्थित होते.

**फडणवीस**

महाराष्ट्र पोलीस दल, अधिक प्रभावशाली आणि कार्यक्षम करण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत वार्ताहरांना दिली. या संदर्भात नागपूरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटबरोबर एक प्रकल्प तयार करण्यात आला आहे, या माध्यमातून गुन्ह्यांची उकल करणं, कायदा आणि सुव्यवस्था राखणं अधिक सुकर होईल तसंच वाहतूक व्यवस्थापनासाठी देखील याचा वापर करता येणार असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. या संदर्भात एक प्रारूप तयार करण्यात आलं आहे. त्याचं सादरीकरण पोलीस दलातील काही प्रमुख अधिकाऱ्यांसमोर काल करण्यात आलं. नवी मुंबईत देशातलं सर्वात आधुनिक सायबर गुन्हे तपास केंद्र तयार करण्यात येत आहे, या सर्व माध्यमातून महाराष्ट्र पोलीस दल हे देशातलं एक आधुनिक पोलीस दल होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

**आकाशवाणी**

आकाशवाणीनं विश्वासार्ह बातम्या देण्याची ओळख जपली आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या रॉयटर्स इन्स्टिट्यूट फॉर स्टडी ऑफ जर्नालिझमच्या ताज्या वार्षिक सर्वेक्षणात आकाशवाणीच्या बातम्यांच्या विश्वासार्हतेच्या बाबतीत असलेल्या अग्रगण्य स्थानावर शिक्कामोर्तब केलं आहे. कोणत्याही परिस्थितीत विश्वसनीय आणि वास्तव

बातम्या देण्याच्या आकाशवाणीच्या अतूट वचनबद्धतेचं हे द्योतक आहे, असं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल यांनी याबद्दल प्रतिक्रिया देताना सांगितलं. सेहगल यांनी काल दिल्लीतील आकाशवाणीच्या कार्यालयात झालेल्या योगदिन कार्यक्रमात सहभाग नोंदवला. यावेळी आकाशवाणीच्या महासंचालक मौशुमी चक्रवर्ती याही उपस्थित होत्या.

मिफ

18व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा काल मुंबईत एका दिमाखदार सोहळ्यात समारोप झाला. यावेळी 'The Golden Thread' या माहितीपटाला आंतरराष्ट्रीय श्रेणीत सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ अभिनेत्री पूनम धिल्लोन यांनी; चित्रपटाच्या दिग्दर्शिका निशिता जैन यांचा सुवर्ण शंख, 10 लाख रुपये आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला. विविध श्रेणीत सर्वोत्कृष्ट ठरलेल्या लघुपट आणि माहितीपटांनाही यावेळी गौरवण्यात आलं. भारतीय कलावंत त्यांच्या कामाच्या माध्यमातून जगभरात पोहोचत असल्याचं राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितलं. तर यंदाच्या महोत्सवात प्रदर्शित केलेल्या चित्रपटांची संख्या तसंच त्याला प्रेक्षकांचा मिळालेला प्रतिसाद लक्षणीय होता असं महोत्सवाचे संचालक प्रिथुल कुमार यांनी सांगितलं.

विज्ञानभारती

विज्ञान विषयाबाबत जनजागृतीसाठी काम करणाऱ्या विज्ञान भारती या संघटनेचं सहावं राष्ट्रीय अधिवेशन आज आणि उद्या पुण्यात लोणी काळभोर इथल्या एमआयटी मध्ये होणार आहे. विज्ञान भारतीचे अध्यक्ष आणि सीएस-आयआर-चे माजी महासंचालक डॉ. शेखर मांडे यांनी ही माहिती दिली. केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जीतेंद्र सिंह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, इस्रोचे अध्यक्ष एस सोमनाथ आदी मान्यवर या अधिवेशनाच्या विविध सत्रात सहभागी होणार आहेत.

**योगदिन**

दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन काल राज्यासह, संपूर्ण देशात, अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत जम्मू आणि काश्मीरमध्ये श्रीनगर इथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य समारंभ झाला. विविध केंद्रीय मंत्र्यांनी देखील देशातील विविध शहरात आयोजित योग शिबिरांमध्ये सहभाग घेऊन योग दिन साजरा केला.

राज्यातही योग दिनानिमित्त विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. मुंबईत राजभवनात राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत योगसत्र घेण्यात आलं. योग ही भारतानं जगाला दिलेली अनमोल देणगी आहे; योगाभ्यासाचा प्रचार - प्रसार करणं हे प्रत्येक भारतीयाचं कर्तव्य आहे, असं राज्यपाल यावेळी म्हणाले. मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत योगासन शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. निरोगी शरीरासाठी योग महत्त्वाचा आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. गेट वे ऑफ इंडिया इथे आयोजित योग शिबिरातही, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी सहभाग घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योग साधनेला आंतरराष्ट्रीय महत्व मिळवून दिल्याचं फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

जळगाव, अहमदनगर, सांगली, पालघर, कोल्हापूर, आणि नाशिकसह राज्यात सर्वच जिल्ह्यांमध्ये काल योग दिनाचा उत्साह पाहायला मिळाला. अकोल्यातील वसंत देसाई क्रीडांगण इथल्या जलतरण तलावात अनेक वर्षांपासून हौशी जलतरणपटू पाण्यात योगा करून योग दिवस साजरा करतात. कालही 5 वर्षाच्या चिमुकलीपासून ते 80 वर्षांच्या आजोबांपर्यंत अनेकांनी यात सहभाग नोंदवत, पाण्यात विविध आसनं केली.

पुण्यातही विविध संस्था संघटनांनी काल योग शिबिराचं आयोजन केलं होतं. पुणे विमानतळावर योग दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सहभाग घेतला. यावेळी त्यांनी योगाचं दैनंदिन जीवनातलं महत्त्व अधोरेखित केलं. भारतीय जनता पक्षाच्या वतीनं कोथरूड इथल्या महेश विद्यालयामध्ये झालेल्या योग शिबिरातही केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, आणि राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सहभाग घेतला. एनसीसीच्या सुमारे सात हजार छात्रांनीही काल पुण्यात सामुहिक योग प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला.

केंद्रीय संचार ब्यूरोतर्फे येरवडा कारागृहात योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी 500 हून अधिक बंदिजनांनी योगाची प्रात्यक्षिकं केली. विविध आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि निरंतर निरोगी राहण्यासाठी योग महत्त्वाचा असल्याचं केंद्रीय संचार ब्यूरोच्या पुणे प्रादेशिक कार्यालयाचे उप-संचालक निखिल देशमुख यांनी यावेळी सांगितलं. येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक सुनील ढमाल यावेळी बोलताना म्हणाले.......

**माओवादी**

2013 माओवादी चळवळीत सक्रिय असलेल्या, सालेकसा तालुक्यातल्या पोलिसांच्या चकमकीत सहभाग असलेल्या जहाल नक्षलवाद्यानं, गोंदिया पोलिसांपुढे शरणागती पत्करली आहे. संजय उर्फ बीच्छेम सुकलू पूनेम असं या माओवाद्याचं नाव असून तो मूळचा छत्तीसगढचा आहे. शासनानं त्याच्यावर 7 लाखाचं बक्षिस जाहीर केलं होतं. या माओवाद्यानं जिल्हाधिकारी प्रजित नायर, जिल्हा पोलिस अधिक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधिक्षक नित्यानंद झा यांच्या समक्ष, नक्षल आत्मसमर्पण योजनेअंतर्गत आत्मसमर्पण केलं आहे.

**बुडूनमृत्यू**

रायगड जिल्ह्यातील खालापूरातील पोखरवाडी इथे पावसाळी पर्यटनासाठी आलेल्या मुंबईतील चार विद्यार्थ्यांचा काल बुडून मृत्यू झाला. रिझवी महाविद्यालयातील एकंदर 37 जण सोंडाई किल्ल्यावर पर्यटनासाठी आले होते. तिथून धावडी नदीच्या बंधाऱ्यावरच्या सांडव्यात डुंबण्याचा आनंद घेत असताना ही घटना घडली.

**हवामान**

दक्षिण कोकण, मध्य-महाराष्ट्राचा घाट प्रदेश आणि मराठवाड्यात जोराचे वारे आणि वीजांसह अतिशय मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भातही तुरळक ठिकाणी जोराच्या वाऱ्यांसह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**